महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहसंचालक
संवर्गातील अधिकारी यांच्या बदलीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**

शासन आदेश :- संकीर्ण २०१८/ प्र.क्र. ९२/ कोषा प्रशा- २
मंत्रालय, मुंबई- ४०००३२, दिनांक:- ४ जून, २०१८.

वाचा :- १) नगर विकास विभाग, अधिसुचना क्र. एमसीओ- २०१८/ प्र.क्र.४८ (भाग-१)/ नवि-१४, दि. २३ मे, २०१८

२) आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचे पत्र क्र. ठा.म.पा. / आयुक्त/ ४६८/ २०१८, दि. ३०/०५/२०१८.

**-: शासन आदेश :-**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहसंचालक संवर्गातील श्री. मनेष वि. वाघीरकर, मुख्य वित्त अधिकारी, महाराष्ट्र लघू उद्योग विकास महामंडळ, मुंबई यांना मुख्य लेखा अधिकारी, ठाणे महानगरपालिका या पदावर नेमणूक देण्याची विनंती संदर्भाधीन क्र. २ पत्रान्वये केली आहे.

२. संदर्भ क्र. १ येथील शासन अधिसुचनेन्वये, मुख्य लेखा अधिकारी, ठाणे महानगरपालिका हे पद महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहसंचालक संवर्गातून भरण्याची तरतुद करण्यात आली आहे. या आदेशान्वये, महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार श्री. मनेष वि. वाघीरकर यांची खालील विवरणपत्रात स्तंभ क्र. ४ मध्ये नमुद पदावर प्रशासकीय बदली करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिका-याचे नाव | सध्याच्या कार्यरत पद व ठिकाण | बदलीचे पद व कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. मनेष वि. वाघीरकर | मुख्य वित्त अधिकारी, महाराष्ट्र लघू उद्योग विकास महामंडळ, मुंबई | मुख्य लेखा अधिकारी, ठाणे महानगरपालिका, ठाणे |

३. श्री. वाघीरकर यांना बदलीच्या पदावर हजर होण्याकरीता त्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे.

४. श्री. वाघीरकर यांनी कार्यमुक्त झाल्यानंतर बदलीच्या पदावर तात्काळ हजर व्हावे. बदलीच्या पदावर हजर होताच संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई आणि शासनास अवगत करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(शुभांगी शेठ)
सहसचिव, वित्त विभाग.

प्रति,

१) महालेखापाल - १ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई.*

२) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.

३) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.*

४) मा. मुख्यमंत्री / मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

५) संबंधित अधिका-यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*

६) संबंधित अधिकाऱ्याची बदली झालेल्या कार्यालयाचे कार्यालय प्रमुख *

७) संबंधित अधिकारी*

८) निवडनस्ती कोषा प्रशा- १ व २ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(* संचालक, ले व को, संचालनालय, मुंबई यांचेमार्फत )